महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअ‍ॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : २४३ वे | दिनांक : ३०/०८/२०२६ | वार : रविवार

## ‘गोकुळ’ची दहीहंडी महायुतीच फोडणार; महाडिकांचा 25-0 विजयाचा दावा



**कोल्हापुर :** यंदा गोकुळ दूध संघाची दहीहंडी महायुतीच फोडणार असून 25 विरुद्ध शून्य अशा एकतर्फी फरकाने गोकुळवर पुन्हा महायुतीचीच सत्ता येईल, असा ठाम विश्वास भाजप खासदार धनंजय महाडिक यांनी व्यक्त केला आहे. यावेळी त्यांनी काँग्रेसचे आमदार सतेज पाटील यांच्यावरही जोरदार निशाणा साधला. सतेज पाटील यांच्या 'समविचारी आघाडी'कडे सध्या निवडणूक लढवण्यासाठी सक्षम उमेदवारच शिल्लक नसल्यामुळे ते आता नाईलाजाने सर्वांच्या भेटीगाठी घेत फिरत आहेत, असा टोला महाडिक यांनी लगावला. आता गोकुळच्या राजकारणात समविचारी पक्षाचा नारा देत फिरणाऱ्या सतेज पाटील यांची ही समविचारी आघाडी यापूर्वी कुठे गेली होती? असा सवाल खासदार धनंजय महाडिक यांनी उपस्थित केला आहे. निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर दोन्ही बाजूंकडून ग्रामीण जिल्हाध्यक्ष, आमदार आणि संचालकांच्या भेटीगाठी सुरूच राहणार असल्याचे स्पष्ट करत, विधानसभा निवडणुकीप्रमाणेच यंदा गोकुळवरही महायुतीचीच निर्विवाद सत्ता राहील, असा ठाम विश्वास महाडिक यांनी व्यक्त केला. धनंजय महाडिक म्हणाले, मी यापूर्वी देखील सांगितलं होतं आत्ता सुद्धा सांगतो राजकारणात कोणी कुणाचा कायमचा शत्रू नसतो किंवा कोणी कोणाचा कायमचा मित्र नसतो. गोकुळ निवडणुकीच्या अनुषंगाने सतेज पाटील आणि आम्ही एकत्र येण्याची कोणतीही चिन्हे नाहीत, असे महाडिक यांनी स्पष्ट केले आहे. गोकुळ दूध संघाच्या आगामी निवडणुकीमुळे कोल्हापुरातील राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. या निवडणूक प्रक्रियेत मंत्री हसन मुश्रीफ गट, शिवसेना आणि जनसुराज्य पक्ष विरुद्ध महाडिक गट असा सुप्त संघर्ष सध्या पाहायला मिळत आहे. या चुरशीच्या लढतीमुळे गोकुळच्या राजकारणात नवी राजकीय समीकरणे उदयाला येण्याची जोरदार चर्चा जिल्ह्याच्या राजकारणात रंगू लागली आहे. दुसरीकडे, महाविकास आघाडीच्या बाजूने काँग्रेस नेते आमदार सतेज पाटील यांनी निवडणुकीसाठी एकहाती रान उठवले आहे. महायुतीमध्ये एकटे पडलेल्या भाजप नेत्यांच्या गाठीभेटी घेण्याचा धडाका त्यांनी लावला असून, समविचारी नेत्यांना सोबत घेऊन ही निवडणूक लढवण्याची त्यांनी जोरदार तयारी सुरू केली आहे. सतेज पाटलांच्या या रणनीतीमुळे आता गोकुळच्या निवडणुकीत नेमका कोणता निकाल लागणार आणि कुणाचा वरचष्मा राहणार, याकडे संपूर्ण कोल्हापूरचे लक्ष लागले आहे.

## रायगडमध्ये CBIची मोठी कारवाई; 40 लाखांची लाच घेताना CGST अतिरिक्त आयुक्त अटकेत



**रायगड :** रायगड जिल्ह्यातील केंद्रीय वस्तू व सेवा कर (CGST) विभागात केंद्रीय अन्वेषण विभागाने (CBI) मोठी कारवाई करत भ्रष्टाचाराचे एक मोठे प्रकरण उघडकीस आणले आहे. एका दगडखाणी व्यवसायाशी संबंधित प्रकरण निकाली काढण्यासाठी तब्बल 40 लाख रुपयांची लाच स्वीकारताना सीबीआयने सीजीएसटीच्या अतिरिक्त आयुक्तांसह एका अधीक्षक आणि एका खासगी मध्यस्थाला अटक केली आहे. सीबीआयने दिलेल्या माहितीनुसार, एका दगड उत्खनन कंपनीचे जीएसटी आणि रॉयल्टीशी संबंधित प्रलंबित प्रकरण बंद करण्याच्या मोबदल्यात या अधिकाऱ्यांनी सुरुवातीला तब्बल 1 कोटी 50 लाख रुपयांच्या लाचेची मागणी केली होती. मात्र, तक्रारदारासोबत झालेल्या चर्चेअंती तडजोड होऊन ही लाचेची रक्कम 40 लाख रुपयांवर निश्चित करण्यात आली होती. लाचेची ही मोठी रक्कम सरकारी अधिकाऱ्यांनी स्वतः न स्वीकारता नरेंद्र राजपूत या खासगी मध्यस्थाकडे देण्यास सांगितले होते. त्यानुसार सीबीआयने 27 ऑगस्ट रोजी सापळा रचून या मध्यस्थाला 40 लाखांची लाच स्वीकारताना रंगेहाथ पकडले. त्याच्या अटकेनंतर केलेल्या कसून तपासात अधीक्षक आणि अतिरिक्त आयुक्तांचा या गुन्ह्यातील थेट सहभाग निष्पन्न झाला आणि त्यांनी लाच स्वीकारल्याची कबुली दिल्यानंतर त्यांनाही तात्काळ बेड्या ठोकण्यात आल्या. या धडक कारवाईत सीबीआयने एकूण तीन जणांना अटक केली आहे. यामध्ये केंद्रीय अप्रत्यक्ष कर आणि सीमाशुल्क मंडळाचे अतिरिक्त आयुक्त विनय कुमार कांठेती, रायगड सीजीएसटी विभागाचे अधीक्षक राकेश कुमार सिन्हा आणि लाचेची रक्कम स्वीकारणारा खासगी मध्यस्थ नरेंद्र राजपूत यांचा समावेश आहे.

## शरद पवारांकडून १० प्रवक्त्यांची नवी यादी; तरुण चेहऱ्यांना संधी



**मुंबई :** राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या (शरदचंद्र पवार) संघटनात्मक पातळीवर महत्त्वाच्या हालचाली सुरू असून पक्षाकडून नव्या 10 प्रवक्त्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. शनिवारी जाहीर करण्यात आलेल्या या यादीत अनुभवी नेते आणि आमदार जितेंद्र आव्हाड यांच्यासह पक्षातील अभ्यासू आणि तरुण चेहऱ्यांना प्रवक्तेपदाची जबाबदारी देण्यात आली आहे. पक्षाची भूमिका, धोरणे आणि विविध राजकीय मुद्द्यांवर माध्यमांसमोर अधिकृतपणे भूमिका मांडण्याची जबाबदारी आता या प्रवक्त्यांवर असणार आहे. पक्षाच्या कोअर कमिटीची महत्त्वाची बैठक शनिवारी पार पडली. या बैठकीत पक्ष संघटना मजबूत करण्यासह आगामी काळातील राजकीय रणनीती, विविध संघटनात्मक विषय आणि पक्षाच्या भूमिकेबाबत सविस्तर चर्चा झाल्याची माहिती आहे. या बैठकीला पक्षाचे ज्येष्ठ नेते आणि प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते. पक्षाने जाहीर केलेल्या नव्या यादीत अनुभवी नेत्यांसोबतच तरुण आणि विविध सामाजिक घटकांमध्ये काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना संधी देण्यात आली आहे. जितेंद्र आव्हाड, क्लाईड क्रास्टो, भीमराव हत्तीअंबीरे, अनिश गवांदे, ॲड. फैजल मिर्झा, महेबूब इब्राहीम शेख, प्रवीण कुंटे पाटील, प्रशांत सोनबा वीरकर, ॲड. हेमाताई पिंपळे आणि डॉ. चंद्रकांत बारेला यांचा समावेश आहे. यापैकी जितेंद्र आव्हाड हे पक्षातील आक्रमक आणि अभ्यासू भूमिका मांडणाऱ्या नेत्यांपैकी एक मानले जातात. त्यामुळे त्यांच्याकडे पुन्हा प्रवक्तेपदाची जबाबदारी देणे हे पक्षाच्या माध्यमांमधील आक्रमक भूमिकेच्या दृष्टीने महत्त्वाचे मानले जात आहे. त्याचबरोबर अनिश गवांदे, महेबूब शेख आणि हेमाताई पिंपळे यांसारख्या तुलनेने नव्या चेहऱ्यांना संधी देत पक्षाने प्रवक्त्यांच्या टीममध्ये वैविध्य आणण्याचा प्रयत्न केला आहे. विशेष म्हणजे, नव्या प्रवक्त्यांची नियुक्ती करण्यापूर्वी पक्षाने यापूर्वी करण्यात आलेल्या सर्व प्रवक्त्यांच्या नियुक्त्या रद्द केल्या होत्या. समोर आलेल्या माहितीनुसार, 4 ऑगस्ट 2026 रोजी पक्षाकडून याबाबत अधिकृत पत्र जारी करण्यात आले होते. शरद पवार यांच्या पक्षाच्या अधिकृत सोशल मीडिया हँडलवर हे पत्र पोस्ट करण्यात आले होते. प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांच्या स्वाक्षरीने जारी करण्यात आलेल्या या पत्रात, यापूर्वी पक्षाच्या प्रवक्तापदासाठी करण्यात आलेल्या सर्व नियुक्त्या पुढील आदेशापर्यंत तत्काळ प्रभावाने रद्द करण्यात येत असल्याचे स्पष्ट करण्यात आले होते. या कालावधीत माजी आमदार विद्या चव्हाण आणि महेश तपासे हे पक्षाचे अधिकृत प्रवक्ते म्हणून प्रसारमाध्यमांसमोर पक्षाची अधिकृत भूमिका मांडतील, असेही त्या पत्रात नमूद करण्यात आले होते. त्यानंतर आता पक्षाने नव्याने 10 प्रवक्त्यांची यादी जाहीर केल्याने पक्षाच्या माध्यम व्यवस्थेत मोठा बदल झाल्याचे दिसून येत आहे. शरदचंद्र पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या कोअर कमिटीची बैठक शनिवारी पार पडली. या बैठकीत पक्ष संघटना आणि विविध राजकीय विषयांवर चर्चा करण्यात आली. बैठकीला खासदार सुप्रिया सुळे, प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे, माजी मंत्री आणि आमदार जयंत पाटील, माजी मंत्री अनिल देशमुख, माजी मंत्री हर्षवर्धन पाटील, आमदार जितेंद्र आव्हाड, माजी मंत्री राजेश टोपे, खासदार डॉ. अमोल कोल्हे, खासदार निलेश लंके, माजी खासदार फौजिया खान, राजेंद्र शिंगणे आणि माजी आमदार ॲड. अशोकबापू पवार यांच्यासह पक्षातील प्रमुख नेते उपस्थित होते. मात्र, या बैठकीला आमदार रोहित पवार उपस्थित नव्हते. त्यामुळे त्यांच्या गैरहजेरीची राजकीय वर्तुळात चर्चा सुरू झाली आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार ३० ऑगस्ट २०२६


## कृषी क्षेत्रात जगाला भारताकडून अपेक्षा - कुलगुरू प्रा. डॉ. संजीव सोनवणे




**नाशिक (प्रतिनिधी) :** यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ माजी विद्यार्थी संघ आणि कृषि विज्ञान केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने कृषी शिक्षणक्रमाच्या माजी विद्यार्थ्यांचा माजी विद्यार्थी मेळावा संपन्न झाला. त्यात महाराष्ट्रातील विविध भागातून जवळपास २२५ विद्यार्थी सहभागी झाले. विद्यापीठाच्या कृषि विज्ञान केंद्र सभागृहात झालेल्या या मेळाव्यास प्रमुख मार्गदर्शक म्हणून विद्यापीठाच्या कृषि विज्ञान विद्याशाखेचे माजी संचालक डॉ. सूर्या गुंजाळ तर ऑनलाईन पद्धतीने माजी विद्यार्थी व सध्या पश्चिम बंगाल येथे आयपीएस अधिकारी म्हणून कार्यरत असलेले उमेश खांडबहाले यांची विशेष उपस्थिती होती. विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. व्यासपीठावर विद्यापीठ व्यवस्थापन मंडळ सदस्य तथा शिक्षणशास्त्र विद्याशाखा संचालिका डॉ. संजीवनी महाले, माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष तथा प्रभारी कुलसचिव डॉ. सुरेंद्र पाटोळे, कृषी विज्ञान केंद्राचे प्रमुख तथा वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. नितीन ठोके, केंद्र संयोजक श्री. हेमराज राजपूत, माजी विद्यार्थी संघाचे सरचिटणीस डॉ. संतोष साबळे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात बोलतांना विद्यापीठाचे मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे म्हणाले की, जगाला कृषीक्षेत्रात भारताकडून उत्पादन तंत्रे, कुशल मनुष्यबळ, कृषीतज्ञ — तंत्रज्ञ याबाबतीत मोठ्या अपेक्षा आहेत. प्रगतीशील भारतातील आजचा शेतकरी हा केवळ साक्षरच नव्हे तर जागृत देखील आहे. आपल्या उत्पादित शेतमालाला योग्य बाजारभाव मिळण्यासाठी त्याला उत्तम मार्केटिंगची गरज आहे. विद्यापीठाने त्या अनुषंगाने पारंपरिक कृषी शिक्षणक्रमांसोबत कृषीस पूरक असे पोर्ट मॅनेजमेंट, वेअरहाऊसिंग संबंधित शिक्षणक्रम सुरु केलेले आहेत. माजी विद्यार्थ्यांनी देखील कृषी संबंधी नवीन शिक्षणक्रम — प्रशिक्षण संदर्भात विद्यापीठास सुचना कराव्यात, त्याचा नक्कीच विचार केला जाईल. तसेच, 'शेती विकायची नाही' हा संदेश प्रसारित करा असे आवाहन कुलगुरू सोनवणे यांनी आपल्या भाषणाच्या अखेरीस केले. प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित असलेले विद्यापीठाच्या कृषि विज्ञान विद्याशाखेचे माजी संचालक डॉ. सूर्या गुंजाळ यांनी आपल्या भाषणात विद्यापीठ कृषी विज्ञान केंद्राच्या प्रगतीचा सुरुवातीपासूनचा धावता आढावा सादर केला. असा मेळावा दरवर्षी घेण्यात यावा अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. विद्यापीठ व्यवस्थापन मंडळ सदस्य तथा शिक्षणशास्त्र विद्याशाखा संचालिका डॉ. संजीवनी महाले यांनी विद्यापीठ व कृषि विज्ञान केंद्र सदैव विद्यार्थ्यांच्या मदतीसाठी तत्पर असल्याची ग्वाही दिली. माजी विद्यार्थी व सध्या पश्चिम बंगाल येथे आयपीएस अधिकारी म्हणून कार्यरत असलेले उमेश खांडबहाले यांनी आपल्या ऑनलाईन व्याख्यानात आपल्या यशात मुक्त विद्यापीठ व कृषि विज्ञान केंद्राचाही वाटा असल्याचे सांगितले. कृषी विज्ञान केंद्राचे प्रमुख व वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. नितीन ठोके यांनी शेतात प्रत्यक्ष काम करणारे विद्यार्थी आमच्यासाठी शिक्षक असल्याचे सांगितले. माजी विद्यार्थी संघाचे सरचिटणीस डॉ. संतोष साबळे यांनी प्रास्ताविकात संस्थेच्या कार्याची माहिती उपस्थित विद्यार्थ्यांना दिली. विद्यापीठाच्या वतीने दरवर्षी मिशन प्रवेश अभियान राबविण्यात येते. या अभियानात माजी विद्यार्थ्यांनी योगदान देऊन नव्याने विद्यार्थ्यांना मुक्त शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी योगदान द्यावे असे आवाहन केले. यावेळी उदय बोडके, दत्तू ढगे, राहुल खैरनार, सुनील भिसे, दिलीप बोरस्ते, गोकुळ पाटील, जालिंधर गोवर्धने, योगेश धोंगडे, ऋतुजा वस्ते व युवराज माने या विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. यानिमित्ताने माजी विद्यार्थ्यांकडून कार्यक्रमाचे अध्यक्ष, प्रमुख पाहुणे, कृषी विज्ञान केंद्र शिक्षक, विद्यापीठ अधिकारी — कर्मचारी यांचा सत्कार करण्यात आला. कृषी विज्ञान केंद्र प्रशिक्षण सहयोगी राजाराम पाटील, संदीप भागवत, श्रीमती अर्चना मोहोड, मंगेश व्यवहारे, हर्षल काळे आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन डॉ. श्याम पाटील यांनी केले. डॉ. प्रकाश कदम यांनी आभार मानले.

## मिलाद-उन-नबी निमित्त जिंतूरमध्ये सकल मुस्लिम समाजातर्फे भव्य रक्तदान शिबिर




**जिंतूर (बी. डी. रामपूरकर) :** ४०० रक्तदात्यांनी केले रक्तदान; डॉ. ओमकार भालेराव यांची माहितीजिंतूर : प्रेषित मुहम्मद पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या जन्मदिनानिमित्त मिलाद-उन-नबीच्या पवित्र पर्वावर आज, दि. २८ ऑगस्ट रोजी जिंतूर येथे सकल मुस्लिम समाजातर्फे भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले.जिंतूर येथील मदरसा दारुल उलूम महेमुदिया, जामा मस्जिद परिसरात आयोजित करण्यात आलेले हे रक्तदान शिबिर सकाळी ९ वाजल्यापासून सायंकाळी ६ वाजेपर्यंत सुरू होते. समाजातील युवकांसह विविध नागरिकांनी उत्स्फूर्तपणे सहभागी होत रक्तदान केले.या रक्तदान शिबिरास राज्य मंत्री तथा परभणी जिल्ह्याच्या पालकमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी भेट देऊन रक्तदात्यांशी संवाद साधला व त्यांना शुभेच्छा दिल्या. सकल मुस्लिम समाजातर्फे मिलाद-उन-नबी निमित्त समाजोपयोगी उपक्रमाचे आयोजन केल्याबद्दल त्यांनी आयोजकांचे कौतुक केले.यावर्षी मिलाद-उन-नबीच्या निमित्ताने शहरात रॅली व डीजे न लावता सामाजिक बांधिलकी जपत रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमातून मानवतेचा, सामाजिक एकतेचा व जनसेवेचा संदेश देण्यात आला.या शिबिरामध्ये तब्बल ४०० रक्तदात्यांनी रक्तदान केले, अशी माहिती डॉ. ओमकार भालेराव यांनी दिली. मोठ्या संख्येने नागरिकांनी रक्तदान करून या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.यावेळी मुस्लिम बांधव, युवक, सामाजिक कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. रक्तदान शिबिर यशस्वी करण्यासाठी सकल मुस्लिम समाजातील पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले.




# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार ३० ऑगस्ट २०२६


## कॅमेरा आणि देव

वरचा सगळा हिशोब ठेवतो
मग गाभाऱ्यात कॅमेरा का ?
भिंतीवरच्या 'सर्वव्यापी' देवापेक्षा
तुमचा विश्वास जास्त त्या तिसऱ्या डोळ्यावर का?

दगडाच्या मूर्तीला सोन्याचे दागिने मढवून
तुम्ही दरवाजाला भलीमोठी कुलुपं ठोकता,
कारण काय ?
देवाच्या संरक्षणासाठी माणूस उभा राहतो
तेव्हा त्या अथांग देवावर तुम्हीच हसता,
का?.

पवित्रतेचा बुरखा ओढून गाभाऱ्यात
जेव्हा गिधाडे अब्रूचे लचके तोडतात,
तेव्हा कुठे झोपलेला असतो तो ईश्वर?
त्याच्याच प्रांगणात जेव्हा चिमुकल्यांचा आक्रोश होतो
तेव्हा कोणत्या आकाशात विलीन होतो तुमचा 'सर्वसत्ताधीश'?

धर्माच्या नावाखाली उघडलीत दुकाने,
पापाचे पापडांसारखे वाटलेत ठेके,
देवाचा धाक दाखवून माणसाला घाबरवणारे
स्वतः मात्र सुरक्षेसाठी कॅमेऱ्याच्या आडोशाला, लपतात का?

जर देवाला सगळं दिसतं, तर हा कॅमेरा का ?
की देव तिथे नाहीच,
तिथे फक्त तुमचा व्यापार आहे!

देव तर तिथून कधीच निघून गेलाय,
जिथे माणसाची नीती आणि विवेक मेलेला आहे.

**डॉ. बाळासाहेब लिहिणार**
**मो. +91 94212 45309**

## कवी संमेलनाच्या अध्यक्षपदी डॉ. प्रभाकर शेळके



**जालना :** साहित्यसम्राट साहित्यसम्राट लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती निमित्त नागसेन ग्रंथालय व मुद्रा साहित्य सेवा संस्थेच्या वतीने आयोजित कवी संमेलन निमित्ताने उद्घाटक जालना महानगर पालिकेच्या महामहीम महापोर मा.वंदनाताई मगरे कवी संमेलनाचे अध्यक्ष जेष्ठ साहित्यिक कवी कथाकार नाट्यलेखक डॉ प्रभाकर शेळके अतिथी कवी मा.सुरेश साबळे जेष्ठ साहित्यिक (बुलढाणा) प्रमुख पाहुणे मा.रमेश देहडकर (समाजसेवक) प्राचार्य राजकुमार म्हस्केजालना समाजकार्य महाविद्यालय जालना.सुधाकर जी वाहुळे,(मार्गदर्शक मुद्रा साहित्य सेवा संस्था, जालना)कविसंमेलनात कवी सुनील लोणकर, डॉ सुहास सदावर्ते,विनोद जैतमहाल, डॉ दिंगबर दाते, डॉ गणेश कंटुले, डॉ राज रणधीर, रेखा गतखणे, कांचन थोरवे,संगीता चव्हाण,प्रा अशोक खेडकर, विनोद काळे,किशोर भालेराव, प्रा कृष्णा कदम, श्रीमंत ढवळे,मनीषा गायकवाड, समाधान खाडे, चंद्रकांत बोर्डे, दिपक मगरे जिजा शिंदे,लक्ष्मीकांत दाभाडकर, संजयकुमार सरदार सर्जेराव खरात,गणेश खरात, मुख्य आयोजक नागसेन ग्रंथालयाचे अध्यक्ष राजेश ओ.राऊत व संयोजक मुद्रा साहित्य सेवा संस्थेचे अध्यक्ष कवी कैलास भाले या कार्यक्रमातचे सुत्रसंचलन कवी सुहास पोतदार व प्रा.पंढरीनाथ सारके करणार आहेत.

## विदर्भाची काशी - गडचिरोली एक निसर्गरम्य जिल्हा

गडचिरोली हा महाराष्ट्रातील नागपूर विभागात (विदर्भ) स्थित एक अत्यंत निसर्गरम्य, जंगलांनी वेढलेला आणि आदिवासी संस्कृती समृद्ध असलेला जिल्हा आहे.प्रमुख भौगोलिक व प्रशासकीय माहितीतपशील *स्थापना -२६ ऑगस्ट १९८२ (चंद्रपूर जिल्ह्यातून वेगळा झाला) *मुख्यालय - गडचिरोली *क्षेत्रफळ - १४,४१२ चौ. किमी (महाराष्ट्राच्या सुमारे ७६% भाग जंगलाने व्यापलेला) *तालुके (१२) । गडचिरोली, अहेरी, आरमोरी, चामोर्शी, धानोरा, एटापल्ली, सिरोंचा, कोरची, कुरखेडा, मुलचेरा, भामरागड, देसाईगंज (वडसा) प्रमुख नद्या- गोदावरी, वैनगंगा, प्राणहिता, इंद्रावती, वर्धा *लोकसंख्या - गोंड, माडिया गोंड, परधान यांसारख्या प्रमुख *आदिवासी जमाती - *जिल्ह्याची महत्त्वाची वैशिष्ट्ये- * वनसंपदा व खनिज: बांबू, सागवान, तेंडू पत्ता आणि मोह ही प्रमुख वन उत्पादने आहेत. लोहखनिज (सुरजागड टेकड्या) आणि इतर खनिजांचे मोठे साठे येथे आढळतात. * सामाजिक व वैद्यकीय कार्य: पद्मश्री डॉ. अभय बंग आणि डॉ. राणी बंग यांची 'शोधग्राम' (सर्च संस्था) तसेच डॉ. प्रकाश आमटे यांचे भामरागड येथील 'लोकबिरादरी प्रकल्प' (हेमळकसा) याच जिल्ह्यात कार्यरत आहेत. * पर्यटन व धार्मिक स्थळे: * मार्कंडा (मार्कंडेय मंदिर): वैनगंगा नदीच्या काठावर स्थित प्राचीन शिवमंदिर, ज्याला 'विदर्भाचे काशी' म्हटले जाते. * भामरागड: तीन नद्यांचा (इंद्रावती, पामुलगौतम आणि पार्लकोटा) संगम असणारे निसर्गरम्य ठिकाण. * चपराळा अभयारण्य: वन्यजीवप्रेमींसाठी प्रसिद्ध अभयारण्य. * सिरोंचा: गोदावरी आणि प्राणहिता नदीचा संगम तसेच जीवाश्म (Fossils) संशोधनासाठी प्रसिद्ध.



**प्रा. डॉ. राजेंद्र सोनवणे.**
**जे ई एस महाविद्यालय जालना.**

## तरुणपणात मित्रांनो!

सांगतो मी आज माझ्या,
पहिल्या प्रेमाची कहाणी.
वाटत होते मनाला माझ्या,
तीच होईल माझी राणी. १

तिच्यासाठी रोज मी,
ताजे गुलाब तोडायचो.
गुलाब घ्यावे म्हणून,
रोज प्रेमपत्र धाडायचो. २

लपून,छपून पाहणे,
रोज रोज चालायचे.
वाटत होते मला पण,
रोज तिला बोलायचे. ३

तिचे चोरून पाहणे,
वाटायचे मला होकार.
भावाच्या भीतीपोटी,
तिने दिले मला नकार. ४

तोडलेले सारे गुलाब,
अनेकदा सुकून गेले.
तिने नकार देताक्षणीच,
मनातून निश्चय केले. ५

प्रेम मिळवायचे असेल तर,
जीवनात यशस्वी व्हायचे.
तरुणपणात मित्रांनो सदा,
इश्कापासून दूर राहायचे. ६

**नागेश बोंतेवाड,**
**छत्रपती संभाजीनगर**


प्रवेश सुरू
बी.ए. मराठी व उर्दू माध्यम
एम.ए मराठी, हिंदी, इंग्रजी व उर्दू
बालसंगोपन
डीप्लोमा गांधी विचार
मानवी हक्क प्रमाणपत्र
संपर्क
9405109103


## जैन वाचनालयाचा आदर्श मुख्याध्यापक पुरस्कार प्रवीण रांजवण यांना जाहीर



**जिंतूर (बी. डी. रामपूरकर) :** तालुक्यातील बोरी येथील जिल्हा परिषद प्रशालेचे उपक्रमशील मुख्याध्यापक प्रवीण बालासाहेब रांजवण यांना कै. जयकुमारजी जैन सार्वजनिक वाचनालयाचा आदर्श मुख्याध्यापक पुरस्कार जाहीर झाला आहे. मुख्याध्यापक प्रवीण रांजवण यांनी जिल्हा परिषद प्रशालेच्या मुख्याध्यापक पदाचा कार्यभार स्वीकारल्यानंतर बरेच आमुलाग्र बदल केले आहेत. विद्यार्थी -शिक्षक आणि कर्मचाऱ्यांना शिस्त लावणे, परिसर स्वच्छता, अध्यापनाकडे विशेष लक्ष, विविध स्पर्धेत सहभाग घेऊन पुरस्कार प्राप्त करण्यासाठी मुख्याध्यापक प्रवीण यांनी पुढाकार घेतला होता. जिल्हा परिषद प्रशालेची सुंदर इमारत असो की वृक्षारोपण यामध्ये रांजवण यांचा हिरारीचा सहभाग आहे. ग्रामस्थ व शिक्षणप्रेमी नागरिकांशी सुसंवाद साधून एक आदर्श शाळा म्हणून बोरी प्रशाला नावारूपास आली आहे. विविध शालेय स्पर्धा व क्रीडा स्पर्धेत जिल्हा परिषदेच्या विद्यार्थ्यांनी विशेष कामगिरी केली आहे. या सर्व बाबीची दखल घेऊन जैन वाचनालयाचे संचालक सौ मीना जैन, पवन ओझा, बालप्रसाद सोमानी, सुर्यप्रकाश सोनी, दीपक राजुरकर, सौ.कांता सोमानी व ग्रंथपाल नेमिनाथ जैन यांनी आदर्श मुख्याध्यापक पुरस्कारासाठी श्री प्रवीण रांजण यांची निवड केली .येत्या 5 सप्टेंबर शिक्षक दिनी रांजवण यांना आदर्श मुख्याध्यापक पुरस्कार मान्यवरांच्या हस्ते एका कार्यक्रमात प्रदान करण्यात येणार असल्याची माहिती ग्रंथपाल नेमिनाथ जैन यांनी दिली. हा पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल प्रवीण रांजण यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

**महाराष्ट्र जनशक्ती**

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार ३० ऑगस्ट २०२६

# मुंबईच्या बाहेर घर आणि आयुष्य प्रवासात...!

मुंबई ही देशाच्या कानाकोपऱ्यातून स्वप्ने घेऊन येणाऱ्या लाखो लोकांची नगरी आहे. शिक्षण, रोजगार, व्यवसाय आणि चांगल्या भविष्याच्या आशेने लोक मुंबईकडे आकर्षित होतात. मात्र आज हीच स्वप्नांची नगरी सामान्य आणि मध्यमवर्गीय नागरिकांसाठी राहण्याच्या दृष्टीने दिवसेंदिवस अधिक महाग होत चालली आहे. विशेषतः मुंबई आणि ठाणे परिसरातील वाढत्या घरांच्या किमतींमुळे स्वतःचे घर घेण्याचे स्वप्न अनेकांसाठी अत्यंत कठीण बनले आहे.एकेकाळी नोकरीच्या ठिकाणाजवळ किंवा मुंबईच्या उपनगरात घर घेणे सामान्य माणसाच्या आवाक्यात होते. आज परिस्थिती पूर्णपणे बदलली आहे. मुंबईतील घरांच्या किमती इतक्या वाढल्या आहेत की सामान्य पगारावर काम करणाऱ्या युवकाला मुंबईत घर घेण्याचा विचारही अनेकदा अशक्य वाटतो. ठाणे परिसरातही हीच परिस्थिती निर्माण झाली असून. परिणामी अनेकांना नाइलाजाने कर्जत, बदलापूर, नेरळ, अंबरनाथ, कसारा आणि इतर दूरच्या परिसरात घर घ्यावे लागते.घर तर तुलनेने परवडणाऱ्या किमतीत मिळते, पण त्याची किंमत माणसाला दररोज आपल्या वेळेतून मोजावी लागते. स्वतःचे घर मिळाल्याचा आनंद असतो, परंतु त्या घरात कुटुंबासोबत जगण्यासाठी पुरेसा वेळच मिळत नाही. सकाळी घराबाहेर पडलेला माणूस रात्री उशिरा परततो आणि त्याचे संपूर्ण आयुष्य हळूहळू प्रवास, कार्यालय आणि झोप या चक्रात अडकून पडते.कल्पना करा, बदलापूर किंवा कर्जत येथे राहणारा एखादा युवक गोरेगाव किंवा मालाड मध्ये नोकरी करतो. त्याचा दिवस पहाटेच सुरू होतो. घरातील इतर सदस्य झोपेत असतानाच त्याला उठून तयार व्हावे लागते आणि स्टेशनच्या दिशेने धाव घ्यावी लागते. अशा वेळी वेळेत लोकल पकडणे अत्यंत महत्त्वाचे असते, कारण काही मिनिटांचा उशीर झाला तरी संपूर्ण दिवसाचे गणित बिघडून जाते. मध्य रेल्वेने प्रवास करून दादरपर्यंत पोहोचणे, तेथील प्रचंड गर्दीतून मार्ग काढत प्लॅटफॉर्म बदलणे आणि त्यानंतर पश्चिम रेल्वेची लोकल पकडून गोरेगाव मालाड पर्यंत जाणे, हा प्रवास रोजच्या जीवनाचा भाग बनतो. गर्दीच्या वेळी लोकलमध्ये बसण्यासाठी तर दूरच, उभे राहण्यासाठीही जागा मिळणे कठीण होते. गोरेगाव किंवा मालाड स्टेशनला पोहोचल्यानंतरही अनेकांचा प्रवास संपत नाही. कार्यालय स्टेशनपासून दूर असल्यास शेअर रिक्षा, बस किंवा इतर वाहतुकीचा आधार घ्यावा लागतो. काही वेळा वाहतुकीसाठी पुन्हा प्रतीक्षा करावी लागते. अशा प्रकारे कार्यालयात पोहोचेपर्यंत दिवसातील अनेक तास आधीच संपलेले असतात. त्यानंतर दिवसभर कार्यालयातील काम, जबाबदाऱ्या आणि ताण सांभाळावा लागतो. संध्याकाळी काम संपल्यानंतर पुन्हा त्याच प्रवासाला सुरुवात होते. गोरेगावहून दादर, दादरहून मध्य रेल्वेचा प्रवास आणि त्यानंतर दूरच्या घरापर्यंतचा प्रवास.सकाळचा थकवा संपण्यापूर्वीच संध्याकाळची धावपळ सुरू होते. अनेक नोकरदार रात्री अकरा-बारा वाजता घरी पोहोचतात. तेव्हा शरीर आणि मन इतके थकलेले असते की कुटुंबातील सदस्यांशी निवांतपणे बोलण्याचीही ताकद उरत नाही. पत्नी दिवसभर पतीची वाट पाहत असते, मुलांना वडिलांसोबत खेळायचे असते, आई-वडिलांना आपल्या मुलाशी दोन शब्द बोलायचे असतात; पण प्रत्यक्षात घरात परतलेला माणूस अनेकदा फक्त जेवण्यासाठी आणि झोपण्यासाठी येतो.यामुळे कुटुंबातील नातेसंबंधांवरही परिणाम होतो. प्रेम कमी असते म्हणून नाती दुरावतात असे नाही; अनेकदा एकमेकांसाठी वेळच उपलब्ध राहत नाही. पती-पत्नीमध्ये संवाद कमी होतो, मुलांच्या आयुष्यात पालकांचा पुरेसा सहभाग राहत नाही आणि आई-वडिलांसोबत निवांत बसण्याची संधी मिळत नाही. घरातील छोट्या - मोठ्या समस्या, गैरसमज आणि भावनिक दुरावा यामागे अनेकदा संवादासाठी वेळ नसणे हे एक महत्त्वाचे कारण ठरते.या जीवनशैलीचा परिणाम शारीरिक आणि मानसिक आरोग्यावरही होतो. रोजचा दीर्घ प्रवास, लोकलमधील गर्दी, वेळेत पोहोचण्याची चिंता, कार्यालयातील ताण आणि आर्थिक जबाबदाऱ्या यामुळे माणूस सतत धावपळीत राहतो. पुरेशी झोप मिळत नाही, व्यायामासाठी वेळ मिळत नाही, मित्र-परिवार आणि सामाजिक जीवनापासून दुरावा निर्माण होतो. स्वतःसाठी काही क्षण काढणेही अनेकांना कठीण होऊन बसते.विशेषतः युवकांची परिस्थिती अधिक कठीण झाली असुन शिक्षण पूर्ण करून नोकरीला लागल्यानंतर मोठ्या आशेने तो स्वतःचे घर घेण्याचे स्वप्न पाहतो. घर घेण्यासाठी मोठे कर्ज घेतो. त्यानंतर घराचा हप्ता, प्रवासाचा खर्च, घरखर्च आणि कुटुंबाच्या जबाबदाऱ्या सांभाळताना त्याचे संपूर्ण आयुष्य धावपळीत जाते. महिन्याचा पगार येतो आणि आवश्यक खर्चांमध्ये संपून जातो. आर्थिक स्थैर्यासाठी सुरू केलेली धडपड अनेकदा वेळेच्या आणि थकव्याच्या मोठ्या संकटात बदलते.मुंबई आणि ठाणे परिसरातील वाढत्या घरांच्या किमती हा आता केवळ रिअल इस्टेटचा प्रश्न राहिलेला नसुन हा सामाजिक, आर्थिक आणि कौटुंबिक प्रश्न बनला आहे. नोकरीची केंद्रे एका ठिकाणी आणि परवडणारी घरे अनेक किलोमीटर दूर अशी परिस्थिती निर्माण झाल्यामुळे सार्वजनिक वाहतुकीवर प्रचंड ताण येत आहे. रेल्वे आणि रस्त्यांवरील गर्दी वाढत आहे आणि त्याचा थेट परिणाम सामान्य नागरिकांच्या जीवनमानावर हि होत आहे.या प्रश्नाकडे सरकार, स्थानिक स्वराज्य संस्था, नियोजन यंत्रणा आणि गृहनिर्माण क्षेत्राने गंभीरपणे पाहण्याची आवश्यकता आहे. नोकरीच्या ठिकाणाजवळ सामान्य माणसाला परवडणारी घरे उपलब्ध होणे, सार्वजनिक वाहतूक अधिक वेगवान आणि सक्षम करणे, उपनगरांमध्ये रोजगाराच्या संधी निर्माण करणे आणि शहरांचा संतुलित विकास करणे आवश्यक आहे. विकासाचा अर्थ केवळ उंच इमारती आणि मोठे प्रकल्प असा नसून, त्या शहरात राहणाऱ्या सामान्य माणसाला सन्मानाने आणि आनंदाने जगता येणे हाही असला पाहिजे.मुंबई ही केवळ इमारतींचे शहर नाही; ती लाखो कुटुंबांच्या आशा, स्वप्ने आणि संघर्षांचे शहर आहे. येथे काम करणाऱ्या सामान्य माणसाला जर आपल्या कुटुंबासोबत वेळ घालवता येत नसेल, मुलांचे बालपण अनुभवता येत नसेल आणि स्वतःच्या आयुष्यासाठी काही क्षण मिळत नसतील, तर विकासाच्या संकल्पनेचा पुर्नविचार करण्याची वेळ आली आहे.आजचा मुंबईकर एका अत्यंत महत्त्वाच्या प्रश्नासमोर उभा आहे घर मिळाले, पण आयुष्य जगण्यासाठी वेळ कुठे आहे?मुंबई आणि ठाणे परिसरातील परवडणाऱ्या घरांचा प्रश्न हा केवळ घरांच्या किमतींचा विषय नाही. तो लाखो युवकांच्या आरोग्याचा, त्यांच्या कुटुंबाचा, नातेसंबंधांचा आणि त्यांच्या संपूर्ण जीवनाचा प्रश्न आहे. "घरासाठी माणूस दूर गेला, पण त्या घरात जगण्यासाठी त्याच्याकडे वेळच उरला नाही—ही आजच्या मुंबईकराची सर्वात मोठी शोकांतिका आहे."



**प्रा. डॉ.सतिश लिला नामदेव दोडके, ठाणे**

# पंडित जवाहरलाल नेहरू महाविद्यालयात पदवीदान समारंभ उत्साहात संपन्न




**छत्रपती संभाजीनगर** : डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ संलग्नित ,अजिंठा शिक्षण संस्था संचलित,पंडित जवाहरलाल नेहरू महाविद्यालयात शिवाजीनगर येथे शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील पदवीदान समारंभ उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. यावेळी बी.ए., बी.कॉम. आणि बी.एस्सी. अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते पदवी प्रदान करण्यात आली.कार्यक्रमाची सुरुवात महाविद्यालय परिसरातून पदवीधर विद्यार्थ्यांच्या मान्यवरांसमवेत काढण्यात आलेल्या मिरवणुकीने झाली. या मिरवणुकीमुळे संपूर्ण महाविद्यालय परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.या कार्यक्रमासाठी अजिंठा शिक्षण संस्थेचे संचालक श्री . शिवदीप रंगनाथ काळे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तसेच स्वातंत्र्यसेनानी उत्तमरावजी पाटील नर्सिंग महाविद्यालयाचे प्राचार्य अन्वरसाब नरेगल यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पंडित नलावडे होते.यावेळी मार्गदर्शन करताना शिवदीप काळे म्हणाले की, "आज पदवी प्राप्त करून तुम्ही आपल्या जीवनातील एक महत्त्वाचा टप्पा पार केला आहे. जीवनात नवनवीन प्रयोग करण्याची आणि सतत शिकत राहण्याची वृत्ती कायम ठेवा. या काळात स्वतःच्या ज्ञानात आणि व्यक्तिमत्त्वात गुंतवणूक करा. आता तुम्ही जीवनातील जबाबदाऱ्या स्वीकारण्यासाठी सज्ज झाले पाहिजे."प्राचार्य डॉ. पंडित नलावडे यांनी पदवीधर विद्यार्थ्यांना शुभेच्छा देताना सांगितले की, "पदवी मिळाल्यानंतर आपण आपल्या देशासाठी आणि समाजासाठी योगदान देण्याचा प्रयत्न केला पाहिजे. महाविद्यालयाशी असलेले आपले नाते कायम जपा. महाविद्यालयात नेहमी येत राहा. आम्ही सदैव तुमच्या सोबत असून तुम्हाला प्रोत्साहन देत राहू. जीवनात मोठे यश संपादन करा." महाविद्यालयातील विद्यार्थी संवेदनशील असून त्यांना जीवनाचे भान असल्याचेही त्यांनी नमूद केले.यावेळी अन्वरसाब नरेगल यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा देताना सांगितले की, "आपण ज्या संस्थेचे पदवीधर आहोत, त्या संस्थेचे नाव समाजात वावरताना उंचावेल, याची प्रत्येकाने जाणीव ठेवली पाहिजे. आपल्या पुढील वाटचालीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा."कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी क्रीडा संचालक डॉ. दिगंबर गंगावणे, राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी डॉ. लक्ष्मीनारायण कुरपटवार , सांस्कृतिक विभागप्रमुख डॉ. प्रशांत देशमुख, महाविद्यालयाचे कार्यालीन अधीक्षक डॉ. रिजवान खान यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. दिलीप बिरुटे यांनी केले. सूत्रसंचलन डॉ. पांडुरंग डापके यांनी केले , तर पदवी वाचन व आभार डॉ. भास्कर टेकाळे यांनी मानले.कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगी व्यासपीठावरील मान्यवरांच्या हस्ते पदवीधर विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. पदवी हातात घेताना विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर दिसणारा आनंद आणि समाधान हा कार्यक्रमाचा विशेष क्षण ठरला.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार ३० ऑगस्ट २०२६


## 'तिफन'ची अठराव्या वर्षात दमदार वाटचाल; ग्रामीण साहित्य-संस्कृतीचा बुलंद आवाज



त्रैमासिक तिफनच्या माध्यमातून २००९ पासून सातत्याने उपक्रमशील राहिलेल्या ग्रामीण महाराष्ट्रातील लोकसंस्कृती, लोकसाहित्य, लोकभाषा आणि समकालीन सामाजिक जीवनाचा वेध घेणारे नियतकालिक तिफन हे अठराव्या वर्षात पदार्पण करीत आहे.या त्रैमासिकाचे संपादक प्रतिनिधी म्हणून डॉ. शिवाजी हुसे यांचे विशेष अभिनंदन करतो. एखादे नियतकालिक खंड न पडता चालवणे हे खूपच अवघड काम आहे. लेखक, प्रकाशन संस्था आणि छपाईचा खर्च, शुद्धलेखनाचे कठीण काम आणि पोस्टाने पाठवे पर्यंतच्या कामासाठी दिला जाणारा वेळ यात संपादकाला गुंतवून घ्यावे लागते.वाचक वर्गणीदार वेळेवर वर्गणी पाठवत नाहीत.हे अनुभव आम्ही विद्यापीठात असताना अनियतकालिक "जाणिवा" च्या निमित्ताने अनुभवले आहे.मी स्वतः बसवराज कोरे, खुशाल कांबळे, अशोक नाईकवाडे, गणेश देशपांडे प्रभाकर हरकळ आणि सद्या महाराष्ट्र राज्याच्या उपमुख्यमंत्री असलेल्या पूर्वीच्या सुवर्णा पाटील आणि आता च्या सुनेत्रा पवार या अनियतकालिकाच्या संपादक मंडळात काम केले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर विशेषांक, मराठवाडा विशेषांक असे काही अंक काढताना होणारी कसरत जवळून पाहिली आहे.यात सतत संपर्क साधत रहाणे आवश्यक असते. वाड्मयीन प्रकारच्या अंकात जाहिराती मिळत नाहीत.अशावेळी पदरमोड करून इज्जत सांभाळावी लागते.हे कठीण काम डॉ. शिवाजी हुसे करीत आहेत.या कामात त्यांना मराठी भाषा, साहित्य संस्कृती आणि संशोधन परिषद औरंगाबाद चे संस्थापक अध्यक्ष डॉ. सर्जेराव जिगे आणि त्यांचे सर्व सहकारी मित्र परिवार त्यांच्या सोबत आहेत म्हणून या सारखे अप्रतिम काम सातत्याने चालू आहे.या कामात पुणे येथील बालकुमार साहित्य संस्था शाखा कन्नड यांचेही योगदान आहे.डॉ.शिवाजी हुसे हे जालना जिल्ह्यातील बदनापूर तालुक्यातील देश गव्हाण या गावचे रहिवासी आहेत. डॉ.शिवाजी हुसे हे एका शेतकरी कुटुंबातून आलेले असल्याने शेतकऱ्यांचा समस्या, दैन्य, दारिद्रय रेषेखालील कुटुंबातील माणसांचे आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक प्रश्नांची त्यांना जाणीव होती.या ग्रामीण जीवनाशी ते निगडीत आहेत. शालेय शिक्षण ग्रामीण भागात झाले. शेतीमधील कामं करून त्यांना शिक्षण घ्यावे लागले. महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण करण्यासाठी ते औरंगाबाद येथे गेले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या मराठी विभागात त्यांनी एम.ए. आणि पीएचडी मिळवली आणि त्यानंतर कन्नड येथील छत्रपती शिवाजी शिक्षण संस्थेतील महाविद्यालयात मराठी विषयाचे प्राध्यापक म्हणून रुजू झाले आणि ते तिथे कार्यरत आहेत. मराठीचे अध्यापन करीत असतानाच त्यांना वाटले आपण एका शेतकरी कुटुंबातून आलेले आहोत नोकरी करून शेती करता येणार नाही. म्हणून साहित्याच्या माध्यमातून आपल्या शेतीविषयक जीवनाला वाट मोकळी करून देण्यासाठी ते या कार्यात सहभागी झाले.प्रथम कन्नड तालुक्यातील वाचक संस्कृती वृद्धिंगत व्हावी, लेखक वाचक मेळाव्यातून साहित्य लेखन करणार्या नवीन लेखकांना प्रोत्साहन मिळावे यासाठी ते प्रयत्नशील राहिले. जालना जिल्ह्यातील त्यांचे मित्र डॉ.यशवंत सोनुने, डॉ सुहास सदावर्ते, डॉ.एकनाथ शिंदे, डॉ.सत्यशिला तौर, डॉ.उगले , डॉ . रावसाहेब ढवळे, डॉ. पंडित रानमाळ,डॉ.किरण इंगळे कन्नडच्या छत्रपती शिवाजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ विजय भोसले, डॉ.रामचंद्र झाडे, डॉ. ज्ञानेश्वर गायके ,सोयगावचे डॉ.बिरूटे, डॉ.डोके अशा अनेकांनी डॉ.शिवाजी हुसे यांच्या त्रैमासिक तिफनच्या माध्यमातून साहित्यिक, सांस्कृतिक, वैचारिक योगदान दिले आहे.ही नांवे केवळ प्रातिनिधिक स्वरूपाची आहेत.मराठवाड्यातून अनेक महाविद्यालयांतील प्राध्यापक या लेखक वाचक चळवळीचे नेतृत्व करीत आहेत.मराठी दलित चळवळीला वाहिलेले नियतकालिक अस्मिता दर्श च्या नंतर ग्रामीण भागातील सामाजिक स्थितीचा, लोकभाषा, लोकसंस्कृतीचा, मराठवाड्याच्या शेती आणि शेतकरी जीवनाचा वेध घेणारे नियतकालिक म्हणून तिफनचा उल्लेख करावा लागेल. डॉ.नानासाहेब सूर्यवंशी, डॉ. शिवाजी देशमुख यांच्या नेतृत्वाखालील अक्षर वाड्मय, या नियतकालिकाचा चेहरा मोहरा वेगळा आहे, भूमिका वेगळी आहे आणि लेखक वाचक वर्ग सुध्दा वेगळा आहे. मराराठवा साहित्य परिषदेच्या वतीने चालविले जाणारे प्रतिष्ठान या नियतकालिकांचे सुध्दा स्वरूप आणि भूमिका वेगळी आहे. या नियतकालिकांचे कार्य, दीर्घ काळापासून चालत आलेले आहे. अनेक साहित्य संमेलनाचे आयोजन, लेखक वाचक मेळावे, चर्चासत्राचे आयोजन करण्यात येते, साहित्यिक कलाकृतींना पुरस्कार दिले जातात. या दीर्घ परंपरा असलेल्या साहित्य संस्थेशी तिफन चळवळीची तुलना करता येत नाही.किवा डॉ . गंगाधर पानतावणे यांच्या अस्मिता दर्श नियतकालिकांचे लेखक, वाचकांच्या पर्यंत जाता येणार नाही. अस्मिता दर्श नियतकालिकांचे लेखक वाचक मेळावे आणि साहित्य संमेलनाच्या निमित्ताने निर्माण झालेल्या वैचारिक चळवळीची बरोबरी करता येणार नाही.पण नवोदित लेखकांना, वाचकांना प्रेरणा प्रोत्साहन देण्यासाठी या माध्यमातून होत असलेले काम खूप महत्त्वाचे आहे असे मला वाटते.विनाअनुदान तत्वावर आधारित असलेल्या या लेखक वाचक चळवळीचे नेतृत्व डॉ.शिवाजी हुसे आणि त्यांचे सहकारी करीत आहेत याचा आम्हाला अभिमान आहे.आज डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या मराठी अभ्यास परिषदेच्या वतीने चालविले जाणारे मराठी भाषा विषयाचे अध्यापनाचे आणि अभ्यास क्रमाचे नियोजन या चळवळीचे नेतृत्व करीत असलेले डॉ. सर्जेराव जिगे आणि त्यांचे सहकारी उत्तम काम करीत आहेत याचाही आम्हाला अभिमान आहे.ही साहित्य चळवळ आता केवळ जालना जिल्ह्यापुरती मर्यादित न राहता ती मराठवाडा विभागाची लोकचळवळ बनली आहे.नुसते आलेले लेख, कथा, कविता, समीक्षा लेख प्रकाशित न करता विविध विषयांवरील माहिती संपन्नता असलेले जवळ जवळ पास पंचेवीस विशेषांकाचे संपादन आणि प्रकाशन केले आहे त्यातील काही निवडक विशेषांकाचा उल्लेख करता येईल.कविता विशेषांक, संत साहित्य विशेषांक,बा.भो.शास्त्री विशेषांक, वासुदेव मुलाटे विशेषांक, कवी विठ्ठल वाघ विशेषांक, बापु बिरू वाटेगावकर विशेषांक, गंगाधर पानतावणे विशेषांक, झाडीपट्टी रंगभूमी विशेषांक, ऊसतोड कामगार विशेषांक, बोलीभाषा विशेषांक, मराठी नियतकालिके विशेषांक,आदीवासी साहित्य विशेषांक, मराठवाडा साहित्य विशेषांक, भाषा, साहित्य, संस्कृती विशेषांक, कथा विशेषांक,लोकवाद्ये विशेषांक, संत बहिणाबाई विशेषांक, वामनदादा कर्डक विशेषांक यशवंतराव चव्हाण विशेषांक अशा काही निवडक विशेषांकाचा उल्लेख करावा लागेल. या शिवाय अनेक लेखक वाचक मेळावे,चर्चासत्राचे आयोजन आणि विभागीय मराठी साहित्य संमेलनाच्या माध्यमातून त्रैमासिक तिफनने आणि मराठी भाषा साहित्य संस्कृती, संशोधन परिषदेने स्वतःचे असे वेगळे स्थान निर्माण केले आहे. त्यांच्या या उत्तुंग भरारी घेणाऱ्या साहित्य संस्थेला मी अभिनंदन करतो.

**प्रा. बसवराज कोरे,**
**जालना**






## अलनिनो

अलनिनोच्या प्रभावात
माझा अक्का शिवार
उभं पिक पावसाविना
डोळ्यादेखत करपतो आहे
दे माय ...धरणी ठाय
म्हणत ओसाळवाणे
त्याचा प्रवास चालु आहे
मुंढीमुरगळल्यागत निस्तेज

गत थावसाळ्यात
रंगवले होते स्वप्नाचे इमले
धुवाधार पावसात
भरले होते विहरी तुडुंब
तुडुंब भरलेल्या
पावसाच्या भरवशावर
केली उशाची भरमसाठ शेती
ऊस नव्हे लावले
हिरवीगार स्वप्ने
ती स्वप्ने चक्काचूर होताना
आतड्याना पडतोय पिळ
पिरगटून टाकतोय
अलनिनो ...

पावसाळ्यात
उगवतो सुर्य लालभडक
मावळता सुर्य रंगात रंगतो
ह्या वर्षाचा सुर्य
निस्तेज निष्क्रीय ओशाळवाणे
बेफाम वाय्रात ढगांचे
नुसतीच धावपळ
ढग विसरून गेलेत
बेफाम होऊन बरसायचं असतं
शेतकऱ्यांना जितं टेवण्यासाटी
मनसोक्त कोसळापचं असतं
अलनिनोच्या कचाट्यात
स्वत:ला गुरफटायचे नसतं

शिंपडलग्यात पाऊस
शिंपल्यात मावेना
शेतकऱ्याची दैना
संपता संपेना
शेतीशिवारात भारलेले
नवचैतन्य
कोमेजून गेले
गळाटलेल्या पिकात
अलनिनोचा येती वास
शेतकऱ्याच्या कष्टाला
अलनिनोचा होती त्रास
बंधाय्राच्या काटेरी झुडपात
एकच नाव घुमती
अलनिनो ... अलनिनो ...
अलनिनो ...

**शिवशरण वरनाळे**






# हर्सूलमध्ये अनधिकृत प्लॉटिंगवर मनपाचा हातोडा; सलग दुसऱ्या दिवशी कारवाई



**छत्रपती संभाजीनगर :** महानगरपालिकेने अनधिकृत प्लॉटिंगवर धडक कारवाई सुरू ठेवली आहे. सलग दुसऱ्या दिवशीही हर्सूल भागातील ग्रीन झोनमधील बेकायदेशीर प्लॉटिंगवर जेसीबी चालवण्यात आला. या कारवाईमुळे शहरात अनधिकृत प्लॉटिंग करणाऱ्या भूमाफियांमध्ये खळबळ उडाली आहे. मनपाची कोणतीही परवानगी न घेता सुमारे 100 ते 110 एकर परिसरावर थाटलेले 1350 हून अधिक अनधिकृत प्लॉट या मोहिमेत उद्ध्वस्त करण्यात आले आहेत. अतिक्रमण विभागाचे सनियंत्रण अधिकारी संतोष वाहुळे यांच्या नेतृत्वाखालील पथकाने शुक्रवारी (28 ऑगस्ट) पहाडसिंगपुरा भागात या कारवाईला सुरुवात केली होती. शुक्रवारी कारवाई सुरू असताना काही नागरिक आणि संबंधितांनी घटनास्थळी गर्दी करत विरोध केला. यामुळे काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. मात्र, अधिकारी संतोष वाहुळे यांनी कोणतीही तडजोड न करता आक्रमक भूमिका घेतली. त्यांनी संबंधितांकडे प्लॉटिंगच्या अधिकृत परवानगीची आणि कायदेशीर कागदपत्रांची मागणी केली. यावेळी एकालाही अधिकृत कागदपत्रे किंवा मनपाची परवानगी सादर करता आली नाही. कागदपत्रे नसल्याचे स्पष्ट होताच प्रशासनाने जेसीबीच्या साहाय्याने अनधिकृत ले-आऊट भुईसपाट केले. शुक्रवारची कारवाई अपूर्ण राहिल्याने शनिवारी सलग दुसऱ्या दिवशी प्रशासनाने हर्सूल भागात आपला मोर्चा वळवला. शनिवारी अतिक्रमण विभागाचे सहाय्यक आयुक्त संजय सुरडकर, इमारत निरीक्षक मुकेश खडसे, रवींद्र देसाई यांच्यासह नागरी मित्र पथक आणि मनपाच्या पूर्ण अतिक्रमण टीमने जेसीबीच्या मदतीने उरलेले ले-आऊटचे सीमांकन आणि अनधिकृत बांधकामे पाडली. सरकारी जागेवर अतिक्रमण करून अनधिकृत प्लॉटिंग करणाऱ्या माफियांवर आता थेट गुन्हे दाखल करण्यात येणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.